वाचले :- १. शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सीएलए-२००७/ (३९२) /काम- ७ अ दिनांक ३ जुलै २००७.
२. इकडील आदेश क्रं.पसह/कावि/१८९६/२०१० दिनांक १/१०/२०१०.
३. इकडील सुधारीत आदेश क्रं.सशा /पसह/कावि/२२७९/२०११ दिनांक १५/१२/२०११
४. मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३२७ दिनांक- १७/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा,पसह संकलन
क्र.सशा/पसह/कावि/ १८९८/२०१५
दि. ११ /०९/२०१५

**विषय :- बालकामगार सल्लागार समिती**

**सुधारीत आदेश**

२/- बालमजुरांचे मालकांच्या छळातून त्वरीत मुक्तता करुन त्याचा प्राथमिक ताबा घेणेत यावा याकरीता शासनाच्या संबंधित विभागाच्या खालील अधिका-यांचे जिल्हा निहाय जिल्हा दंडाधिका-यांच्या थेट नियंत्रणाखाली वरील आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. मा.पालकमंत्री पुणे जिल्हा यांचेकडून दि.१७/०८/२०१५ रोजी बाल कामगारांशी निगडीत इच्छुक स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधींचे शिफारशीचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारीत आदेश पारीत करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना व नावे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे-१ | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक | चव्हाणनगर, पाषाण, पुणे | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे | जिल्हा परिषद, पुणे-१ | सदस्य |
| ४ | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी पुणे | २८, राणीचा बाग, पुणे-१ | सदस्य |
| ५ | जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | जिल्हा परिषद,पुणे-१ | सदस्य |
| ६ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | जिल्हा परिषद, पुणे-१ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | जिल्हा परिषद, पुणे-१ | सदस्य |
| ८ | प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | सदस्य |
| ९ | त्या विभागातील कार्यरत बालकामगारांशी निगडीत इच्छुक स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी<br>१) सौ. अदिती रामप्रसाद क्षेत्री<br><br>२) ॲड. प्रितम रामदास शिंदे | <br>१) से.नं.१७/१९ घरकुल बिल्डिंग, फ्लॅट नं.५०४, संतकृपा, चिखली पुणे मो.नं.८६०५७४५६३८<br>२) रोशन इनक्लेव्ह, कळुस रोड, चाकण, ता.खेड, जि. पुणे मो. नं.८८८८५८२८५८ | <br>सदस्य<br><br>सदस्य |
| १० | कामगार उपायुक्त, पुणे जिल्हा | कामगार उपायुक्त कार्यालय, मुंबई - पुणे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-५ | सदस्य सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :-

१) कामगार उपआयुक्त, पुणे जिल्हा तथा सदस्य सचिव, कामगार उपायुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रस्ता, शिवाजीनगर, पुणे-५

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेले असून सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे.तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी. वरील समितीच्या बैठका दर महिन्याला घेणेत याव्यात याचीही नोंद घ्यावी.

२) मा.प्रधान सचिव, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस सविनय सादर.

३) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

४) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

**जिल्हाधिकारी पुणे करिता**

(20)

बालकामगार-निर्मुलन व पुनर्वसन
राज्य कृती आराखडा.

जिल्हाधिकारी, पुणे
कार्यासन संकलन
4 AUG 2007
प्रमुख लिपिक शाखाधिकारी
निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी

## महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांकः सीएलए-२००७/(३९२)/काम-७अ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :३ जुलै २००७.

**संदर्भ** :- १. याचिका क्र.४६५/१९८६ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा.
२. शासन निर्णय क्र. सीएलए-२००६/(२९९)/कामगार-७अ, दि.२५ एप्रिल २००६.

**प्रस्तावना :**

बाल मजूरी ही एक गुंतागुंतीची आर्थिक व सामाजिक समस्या आहे. तिची सांस्कृतिक अणि सामाजिक पाळेमुळेही खोलवर रुजलेली आहेत. जगात सर्वत्र आणि भारतात देखील लाखो मुले बालमजुरीत गुंतल्याने त्यांच्या शिक्षणावर, विकासावर आणि भविष्यातील उदरनिर्वाहावर अयोग्य परिणाम होत आहे. बालुमजुरांपैकी बहुतेक जण धोकादायक आणि शोचनीय परिस्थितीत काम करीत असल्याने त्यांचे अपरिमित शरीरिक व मानसिक नुकसान होत असते. बालमजुरी करणारे बालक, त्यांच्या शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सहभाग या बालहक्कांपासूनही वंचित रहाते. बालमजुरी ही केवळ कुटुंबालाच नव्हेतर अवघ्या देशालाही आर्थिकदृष्टया नुकसानकारक आहे. कारण बालमजुरीमुळे ते कुटुंब गरिबी आणि अकुशल कामाच्या विळख्यात अडकून पडते. म्हणूनच बालमजुरीचे परिणामकारक निर्मूलन हा सरकारच्या विकासविषयक धोरणांचा आवश्यक भाग असणे गरजेचे आहे.

बालमजूरांची मालकांच्या जाचातून मुक्तता करणे, बालमजूरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे व आवश्यकतेप्रमाणे त्यांचे कुटूंबीयांचे शक्यतोपरी पुनर्वसन करणे, जनजागृती आणि सामाजिक अभिसरण करणे आवश्यक आहे. याबाबत यशदा, पुणे या संस्थेने सादर केलेला बाल कामगार निर्मूलन कृती आराखडा शासनाच्या विचाराधीन होता. त्यासंदर्भात आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

१. यशदा, पुणे या संस्थेने सादर केलेल्या बाल कामगार निर्मूलन कृती आराखडयास शासन हयाद्वारे मंजूरी देत आहे. महाराष्ट्र राज्यातील बाल मजूरी हया अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करुन सर्व मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाने पुढील दोन उद्दिष्टे निश्चित केले आहेत :-

१. सन २००८ अखेर धोकादायक उद्योगातील आणि घृणित स्वरुपाची बाल मजूरी संपुष्टात आणणे.
२. सन २०१० पर्यंत सर्व प्रकारच्या बाल मजूरीचे समूळ उच्चाटन करणे.

२. वरील दोन्ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे कृती आराखडयास मान्यता देत आहे.

१. बाल मजूरांचे सर्वेक्षण आणि जाणिवा जागृती
२. बाल मजूरांची मुक्तता, मुक्त केलेल्या बाल मजूरांचे कुटुंबामध्ये व शैक्षणिक पुनर्वसन
३. इतर शैक्षणिक उपक्रम (गळती रोखणे)
४. स्थलांतरीत मुलांसाठी विशेष कृती कार्यक्रम
५. घरकाम करणा-या मुलांसाठी विशेष कृती कार्यक्रम
६. बाल कामगारांच्या पालकांना उत्पन्नाचे पर्यायी मार्ग पुरविणे
७. जनजागृती व सामाजिक अभिसरण
८. बालमजूरीसंबंधी संनियंत्रण
९. प्रशिक्षण, क्षमतावृध्दी, संशोधन

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१.
सर्वसाधारण शाखा
दिनांक -4 AUG 2007
दु. लि.
प्रमुख लिपिक

३. **अंमलबजावणी**

सदर कृती आराखडयाची अंमलबजावणी **परिशिष्ट अ** प्रमाणे करण्यात यावी. राज्यपातळीवर त्याची सर्व जबाबदारी खालील राज्य बालकामगार पुनर्वसन आणि कल्याण संस्थेवर राहील. राज्य बालकामगार पुनर्वसन आणि कल्याण संस्थेची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामगार आयुक्त, मुंबई | - अध्यक्ष |
| संचालक, शालेय शिक्षण विभाग | - सदस्य |
| राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक परिषद | - सदस्य |
| आयुक्त, महिला व बाल विकास | - सदस्य |
| संचालक, सामाजिक न्याय | - सदस्य |
| आयुक्त, आदिवासी विकास | - सदस्य |
| पोलीस महासंचालक | - सदस्य |
| अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| आंतरराष्ट्रीय कामगार संघटना प्रतिनिधी | - सदस्य |
| उपमहासंचालक, संशोधन, यशदा, पुणे | - सदस्य सचिव |

जिल्हापातळीवर ज्या जिल्हयांमध्ये राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प चालविला जातो त्या जिल्हयांमध्ये अस्तित्वात असलेल्या प्रकल्प संस्थेवर, तर इतर जिल्हयांमध्ये खालीलप्रमाणे रचना करण्यांत येत असलेल्या जिल्हा बाल कामगार पुनर्वसन आणि कल्याणकारी संस्थेवर कृती आराखडयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी असेल.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - सदस्य |
| जिल्हा शिक्षण अधिकारी, प्राथमिक | - सदस्य |
| जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | - सदस्य |
| पोलीस अधिक्षक | - सदस्य |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| समन्वयक जिल्हा नगर विकास यंत्रणा | - सदस्य |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | - सदस्य |
| अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| कामगार उपायुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/कामगार अधिकारी | - सदस्य सचिव |

४. **सनियंत्रण**

राज्य कृती आराखडयाच्या अंमलबजावणीच्या संनियंत्रणासाठी खालीलप्रमाणे राज्य संनियंत्रण समितीची रचना करण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| मुख्य सचिव | - अध्यक्ष |
| महासंचालक, यशदा, पुणे | - सदस्य |
| सचिव (कामगार) | -सदस्य |
| सचिव (वित्त) | - सदस्य |
| सचिव, शालेय शिक्षण | - सदस्य |
| सचिव, ग्राम विकास | - सदस्य |
| सचिव, सार्वजनिक आरोग्य | - सदस्य |
| सचिव, महिला व बाल विकास | - सदस्य |
| सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | - सदस्य |

(73)

| | |
|---|---|
| सचिव, आदिवासी विकास | - सदस्य |
| महासंचालक, माहिती आणि प्रसिध्दी | - सदस्य |
| सचिव, सामाजिक न्याय | - सदस्य |
| सचिव, नगर विकास | - सदस्य |
| कामगार आयुक्त, मुंबई | - सदस्य सचिव |

**५. आर्थिक तरतूद -**

सदर कृती आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी वार्षिक रु.१८ कोटी ६५ लाख इतका खर्च प्रस्तावित करण्यांत आला असून त्यासाठी खालीलप्रमाणे अनुदानाचे स्त्रोत निश्चित करण्यांत आले आहेत.

१) सर्व शिक्षा अभियानातील निधी - रु.९ कोटी,
२) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून अनुदान - रु.५ कोटी,
३) यशदा, पुणे (आंतरराष्ट्रीय श्रम संघटना व इतर माध्यमातून) - रु.४.६५ कोटी.

परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाबनिहाय खर्च करण्यांची जबाबदारी राज्य बालकामगार पुनर्वसन आणि कल्याण संस्थेवर राहील. त्याचा मासिक अहवाल वेळोवेळी सचिव (कामगार) यांना सादर करण्यांत यावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
शासनाचे सचिव

प्रति,

महासंचालक, प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना सदर शासन निर्णयाला व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.

प्रतीलिपी :-

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय मुंबई,
प्रधान सचिव,महसूल, मंत्रालय मुंबई,
सचिव, महिला व बालविकास, मंत्रालय मुंबई,
सचिव,शालेय शिक्षण, मंत्रालय मुंबई,
सचिव, सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय मुंबई,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
कामगार आयुक्त, मुंबई.
आयुक्त, महिला व बाल कल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कक्ष,
निवड नस्ती (कामगार-७अ).